**<u>जाहिरात</u>**

**अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००८ यांचे कार्यालय**

**जाहिरात क्रमांक** **ठिकाण** **दिनांक :-**

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील गट (क) संवर्गातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १६ रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय / खुला प्रवर्गातील इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| जाहिरात क्रमांक | पदनाम | एकुण पदसंख्या | वेतन श्रेणी (Pay scale) |
|---|---|---|---|
| १. | सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक | १६ | एस-१५-रु.४१८००- रु.१३२३०० |

नमूद संवर्ग पदांची निवड प्रक्रीया ही ऑनलाईन परीक्षा पध्दतीने घेण्यात येणार असून त्याबाबतचा दिनांक व वेळ खालील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. जाहितातीमधील नमूद अटींची पूर्तता करणारे उमेदवार खालील विहीत दिनांकाचे मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज, परीक्षा शुल्कासह भरु शकतात. ऑनलाईन भरलेल्या अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

उपरोक्त संवर्ग पदाच्या भरतीबाबतची जाहिरात अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ <u>www.mahacid.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेसंबंधित आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- | दि.१०/०२/२०२६ वेळ १०.०० वा.पासून |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- | दि.११/०३/२०२६ वेळ २४.०० वा.पर्यंत |

**<u>भरती करावयाचे पदे :-</u>**

**१) पदाचे नाव :- सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक , सरळसेवा भरती**

वेतनश्रेणी एस - १५- रु.४१,८००-रु.१,३२,३०० **एकुण पदे :- १६**

**समांतर आरक्षण तक्ता**

| सामाजिक आरक्षण | अ.जा. १३% | अ.ज. ७% | विजाअ ३% | भज-ब २.५% | भज-क ३.५% | भज-ड २% | विमाप्र २% | इ.मा.व १९% | एसईबीसी १०% | इडब्ल्युएस १०% | अराखीव २८% | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची रिक्त पदे | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **१** | **०** | **५** | **३** | **३** | **२** | **१६** |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | २ | २ | १ | ९ |
| महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | १ | ५ |
| खेळाडू ५ % | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २ % | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| अंशकालीन पदवीधर १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **१** | **०** | **५** | **३** | **३** | **२** | **१६** |

सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक पदाकरिता समांतर आरक्षण नमूद तक्त्यानुसार लागू राहील, तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानुसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पदांवरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

**अ) शैक्षणिक अर्हता :-**

i) मान्यता प्राप्त विद्यापीठातील विज्ञान शाखेतील पदवीधर मुख्य विषय रसायन शास्त्र व भौतीकशास्त्र उपविषयासह प्रथम अथवा द्वितीय श्रेणीतील पदवीधर

किंवा

न्यायसहाय्यक विज्ञान शाखेतील पदवीधर B.Sc. (Forensic Science)

(गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफएसएल-०४१७/प्र.क्र.२०७/पोल-४,दि.०८/१२/२०१७)

ii) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

iii) मराठी आणि हिंदीचे ज्ञान आवश्यक असून गुजराथी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान अतिरिक्त पात्रता म्हणून समजले जाईल.

**ब) शारीरिक पात्रता :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २७.०५.२००८ नुसार अपंगांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

**२) वयोमर्यादा :-**

अ) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयात विहीत केलेल्या कमाल वयोमर्यादेत अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक म्हणजे ११/०३/२०२६ रोजी खालील प्रमाणे किमान व कमाल वयोमर्यादा राहिल.

| अ.क्र | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | १८ | ४३ |
| ३ | अंशकालीन उमेदवार | १८ | ५५ |
| ४ | माजी सैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा +३ वर्षे | |

**३) सामाजिक व समांतर आरक्षण**

१) महिला आरक्षण :-

अ) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाकडील शा.नि.क्र.महिआ-२०२३/ प्रक्र१२३/ कार्या-२, दि.०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांनी तसेच मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने वरील शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेली आहे.

ब) मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, विमुक्तजाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) आणि विशेष मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदांवरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

क) महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करुन घेणेत येईल.

२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक:-

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लुएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक दुर्बल घटकातील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांचा ग्राह्यता कालावधी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो २०२३/ प्र.क्र.४०/१६-अ, दिनांक २३ मार्च २०२३ नुसार सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षातील नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र ( Non-Creamy Layer Certificate) असणे आवश्यक आहे.

३) या व्यतिरिक्त मागासवर्गीय, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, महिला, खेळाडू, अंशकालीन पदवीधर यांचेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेले आरक्षण लागू राहील. मागास प्रवर्गातील उमेदवारांना व सदर घटकातील उमेदवारांना सर्व पात्रता निकष शासन निर्णयानुसार पूर्ण करणे आवश्यक राहील.

४) खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पदवीधर-पदवीधारक अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या-त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार करणेत येईल.

५) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्गाचा दावा करणारे उमेदवारांनी २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात वैध असणारे व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्यासाठी या जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वीचे असणे आवश्यक आहे.

**४) सहायक शासकिय दस्तऐवज परिक्षक या पदाच्या परीक्षेचे स्वरुप व निवड प्रक्रिया :-**

१) परीक्षेचे स्वरुप:-

i) अर्हताप्राप्त उमेदवारांची ऑनलाईन २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेमध्ये भाग I मध्ये १२० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा व भाग II मध्ये ८० गुणांची निरीक्षण चाचणी ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येईल. सदर निरीक्षण चाचणीकरिता दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुलनात्मक परिक्षणाने आकलन करुन देणे आवश्यक राहील. तसेच काही प्रश्नांची उत्तरे त्या-त्या प्रश्नानुसार द्यावी लागतील.

ऑनलाईन भाग-I ची परीक्षा १२० गुणांची असून त्यामध्ये वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असेल. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. परीक्षेचे माध्यम मराठी/ इंग्रजी राहील. बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, इंग्रजी, मराठी, संगणक, सामान्य ज्ञान या विषयांची राहिल.

ii) २०० गुणांची ऑनलाईन परीक्षेसाठीचा कालावधी १२० मिनिटांचा असेल.

iii) उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उमेदवारांकरिता ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप समजणेकरिता सराव चाचणीचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) गुणवत्ता प्राप्त उमेदवारांना आरक्षण व रिक्त पदानुसार प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलावण्यात येईल. या बाबतची माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३) मुलाखत:- साप्रवि, शासन निर्णय क्र.प्रानिम-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दिनांक ०५/०६/२०१४ अन्वये मुलाखत प्रक्रीया रद्द करण्यात आली आहे.

४) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परिक्षा व निरीक्षण परीक्षेमध्ये उच्चगुण प्राप्त उमेदवारामधून शा.नि दिनांक १९/१०/२००७ नुसार रिक्त पदांच्या संख्येच्या प्राप्त गुणांनुसार व प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५) सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक म्हणून नेमणूक झालेल्या उमेदवारांना एक वर्ष कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक पदाची खात्यातंर्गत परीक्षा घेण्यात येईल. त्यामध्ये अनुत्तीर्ण उमेदवारास पुन्हा तीन महिन्यांनी दुसरी संधी देऊन परीक्षा घेण्यात येईल. त्यामध्ये त्यांना उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील अन्यथा सदर एक वर्ष तीन महिने कालावधीमध्ये उत्तीर्ण न झालेल्या उमेदवारास या सेवेतून कमी करण्यात येवून प्रशिक्षणाचा खर्च उमेदवाराकडुन वसूल करण्यात येईल.

**५) सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१. उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अर्ज भरण्या तारखेपूर्वीचे असणे आवश्यक आहे.

२. आर्थिक निकषाबाबतचे तत्व (क्रीमीलेअर) लागू करण्यात आलेल्या (इमाव, विजाअ, भजब,-क-ड, व विमाप्र) उमेदवारांना उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले दिनांक ११/०३/२०२६ पर्यंतचे रोजीचे अथवा पुढील वित्तीय वर्षाचे नॉन- क्रीमीलेअर प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र अर्ज भरण्याच्या तारखेपूर्वीचे असणे आवश्यक आहे.

३. प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त/ खेळाडू /अशंकालीन पदवीधर / माजी सैनिक हे उमेदवार एकाचवेळी दोन समांतर आरक्षणाचा लाभ देण्याबाबतची नोंद अर्जात करतात. अशा उमेदवारांना कुठल्याही एकाच समांतर आरक्षणाचा लाभ देय असल्याने समांतर आरक्षणाकरिता प्राधान्यक्रम उमेदवाराने निश्चित करावा.

४. जाहिरातीमधील सूचना/ मजकूर पूर्णपणे वाचूनच अर्ज करण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी. आवेदन अर्ज भरताना झालेल्या चुकांना उमेदवार स्वत: जबाबदार राहतील.

५. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करत असताना दिलेले भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आय.डी भरती संपेपर्यंत बदलू नयेत. तसेच उमेदवारांना भरती संबधी सूचना वेळोवेळी नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध करुन दिल्या जातील. त्याप्रमाणे उमेदवारांनी सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस बसण्याचा/ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. भरती प्रक्रीयेदरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवारांचे अर्ज भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व संबंधीत उमेदवार कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील तसेच ते भारतीय न्याय संहिता कलम १९९ चा २३६ व २०० चा २३७ प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

७. समांतर आरक्षणातून पात्र होणाऱ्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी ही त्या-त्या संबंधीत विभागाकडून करण्यात येईल.

८. चारित्र्य व पूर्व आयुष्य पडताळणी :- उपरोक्त पदावर निवड झालेल्या उमेदवाराचे चारित्र्य आणि पूर्व आयुष्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय उमेदवारास नियुक्ती देण्यात येणार नाही किंवा प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार नाही. ज्या उमेदवारांविरुध्द न्यायालयात खटला प्रलंबित आहे अशा उमेदवाराना नियुक्ती देण्यात येणार नाही.

९. निवड झालेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतूदीनुसार शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशास अनुसरुन वैद्यकीय चाचणी करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीत सुदृढ शरीरयष्टी व निर्दोष दृष्टी आणि इतर चाचण्यांचा समावेश असेल. निवड झालेले जे उमेदवार सदर चाचण्यामध्ये अपात्र ठरतील, त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१०. सदर पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास त्या संबंधाच्या नियमानुसार विहीत केलेली हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा ती उत्तीर्ण होण्यापासुन सूट मिळाली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

११. सदर पदावर निवड झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र राज्यात कोठेही नियुक्तीस/ बदलीस पात्र राहील. निवड झालेल्या उमेदवारास सबंधित पदाचे नियमानुसार वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील.

१२. सदर पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (शिस्त व अपील) १९८१ आणि राज्य शासनाने व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम किंवा आदेश लागू राहतील.

१३. जन्म दिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/ शालांत परीक्षा प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी सादर करावे.

१४. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्यानी दिलेले जात प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१५. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशा विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

१६. अंशकालीन उमेदवाराचे बाबतीत त्याचे अंशकालीन सेवेची अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी बाबतची कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करावी लागतील.

१७. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दिनांक २८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ अन्वये दिनांक २८/०३/२००५ रोजी हयात असलेल्या व त्या नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या या बाबत लहान कुटुंब असलेचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१८. आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापुर्वीचे असावीत व सदरची मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

**६) परीक्षा शुल्क :-**

| जाहिरात क्रमांक | पदाचे नावं | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ०१ | सहायक शासकिय दस्तऐवज परिक्षक | १०००/- | ९००/- |

सदरचे शुल्क ना-परतावा आहे.

**टिप :-** माजी सैनिक यांचेकरिता कोणतेही परीक्षा शुल्क लागु नाही.

**७) उमेदवारांकरीता इतर सर्वसाधारण अटी, शर्ती व सूचना :-**

१. सदर भरती प्रक्रीयेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२. भरती प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास सबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

३. भरती प्रक्रीयेअंतर्गत पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रीयेमध्ये अंशत: बदल करणे, स्थगित करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे, याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील.

४. सदर भरतीच्या नियम निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना/निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बदल झाल्यास त्या-त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, ती सर्वांवर बंधनकारक राहील.

५. जाहिरातीतील पदांची भरती बाबत अध्यक्ष, भरती समिती यांचा निर्णय अंतिम असेल, त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही करु नये याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. मागासवर्गीय उमेदवारांनी, ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुनच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी. याबाबत, उमेदवारांकडून नंतर कोणतेही अभिवेदन अथवा तक्रार स्वीकारली जाणार नाही.

७. आवेदन अर्ज एकदा Submit केलेनंतर त्यात पुन्हा बदल करता येणार नाही.

८. भरती करणेबाबत कोणीही पैशाची अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती पोलीस अधिक्षक/ पोलीस उप आयुक्त लाचलुचपत प्रतिबंध विभाग, पुणे यांचे कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२१३४ व ०२०-२६१२८८९१ तसेच टोल - फ्री क्रमांक १८०० २२२ ०२१ या दूरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी.

९. उमेदवारांना काही तांत्रिक अडचणी भासल्यास दुरध्वनी क्रमांक ०२२-६१०८७५५७ व जाहिराती संदर्भात काही अडचणी भासल्यास दुरध्वनी क्रमांक ०२०-२५६३८४४४ या हेल्प लाईन नंबरवर १०:०० ते १८:०० या वेळेत संपर्क साधावा.

**<u>महत्त्वाची टिप :-</u>**

- उमेदवाराला ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण व इतर सर्व पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरण्यात आलेले ऑनलाईन अर्जच स्वीकारले जातील.
- भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवारांस कोणतीही इजा/ नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- भरती प्रक्रियेअंतर्गत पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल करणे स्थगित करणे, कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे याबाबतचा अंतिम निर्णय याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील.
- भरतीबाबत काही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबत अंतिम निर्णय हा भरती प्राधिकारी यांचा राहील.

दिनांक :- १०/०२/२०२६.

सही/-

ठिकाण :- पुणे.

अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.